

कोलंबोमधील सिंहली स्पोर्टस् क्लब आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेतविरुध्दच्या दुसऱ्या आणि शेवटच्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी शुक्रवारी श्रीलंकेच्या दानुष्का गुणतिलकाची एक उसळता चेंडू चुकविताना अशी त्रेधातिरपीट उडाली. दक्षिण आफ्रिकेचा डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराजने या सामन्यात कारकीर्दीतील सर्वोत्तम कामगिरी नोंदविताना ११६ धावांच्या मोबदल्यात आठ बळी टिपले. त्यामुळे श्रीलंकेची धावसंख्या दिवसअखेरीस ९ बाद २७७ धावांपर्यंतच मर्यादित राहिली.

भारतापुढे आज सलामीलाच इंग्लंडचे आव्हान

टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेच्या पात्रतेचे लक्ष्य गाठण्यासाठी सत्त्वपरीक्षा

वृत्तसंस्था

लंडन, दि. २० - आठ वर्षांनंतर पुनरागमन करणाऱ्या आणि टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेच्या पात्रतेचे लक्ष्य गाठण्याचे उद्दिष्ट बाळगणाऱ्या भारतीय महिला हॉकी संघांचा विश्वचषक स्पर्धेत उद्या यजमान इंग्लंडशी सामना होणार आहे. २०१७ च्या आशिया चषक विजेता भारतीय संघ जागतिक क्रमावारीत दहाव्या तर इंग्लंड दुसऱ्या स्थानावर आहे. त्यामुळे या सामन्यात भारतीय महिला संघाची कसोटी लागणार आहे.

शनिवारपासून सुरू होत असलेल्या या स्पर्धेत भारताचे नेतृत्व संघातील अनुभवी खेळाडू राणी रामपाल करणार आहे. नुकत्याच झालेल्या स्पेन दौऱ्यात भारतीय संघाने चमकदार कामगिरी केली आहे आणि त्यांच्याकडून विश्वचषक स्पर्धेत अशाच सात्यपूर्ण कामगिरीची अपेक्षा आहे. भारताला 'ब' गटात इंग्लंडव्यतिरिक्त अमेरिका आणि आयर्लंड यांचा सामना करावा लागणार आहे. ही स्पर्धा ५ ऑगस्टपर्यंत चालणार आहे.

दरम्यान, या स्पर्धेत भारतीय महिला संघ विजेतेपदाचा दावेदार नसला, तरीही संघातील अनुभवी खेळाडूंच्या जोरावर आम्ही बाजी मारु शकतो, असा आत्मविश्वास कर्णधार राणी रामपालने लंडनला विश्वचषकासाठी रवाना होण्यापूर्वी व्यक्त केला होता.

राणीने म्हटले होते की, काही खेळाडूंचा अपवाद वगळता आम्ही सर्व जणी गेल्या २ वर्षांपासून एकत्र खेळत आहोत. प्रत्येक खेळाडूकडे किमान १५० ते २०० सामन्यांचा अनुभव आहे आणि हाच अनुभव आम्हाला या स्पर्धेत तारु शकता.

यावेळी विश्वचषकात आपला संघ चांगली कामगिरी करेल, असा आत्मविश्वासही राणीने व्यक्त केला होता.

तब्बल ८ वर्षांच्या दिर्घ कालावधीनंतर भारतीय महिला संघ विश्वचषकासाठी पात्र ठरला आहे. राणी आणि दिपीकाचा अपवाद वगळता भारताच्या एकाही खेळाडूकडे विश्वचषकात खेळण्याचा अनुभव नाही. मागच्या वर्षी आशिया चषकाचे विजेतेपद मिळविल्यानंतर संघातील सर्व खेळाडू या संधीची वाट पाहत होत्या. त्यामुळे या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी आम्ही उत्सुक असल्याचे राणीने स्पष्ट केले होते.



विश्वचषक महिला हॉकी

रत्नागिरी प्रीमियर लीगचा आजपासून थरार

महाराष्ट्रातील अव्वल १६ खेळाडूंच्या सहभागामुळे चुरस

वृत्तसंस्था

रत्नागिरी. दि. २० -रत्नागिरी जिल्हा कॅरम असोसिएशन आयोजित व महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने यंदा सलग तिसऱ्या वर्षी रत्नागिरी प्रीमियर लीग सिझन ३ चे आयोजन रत्नागिरी येथे उद्या शनिवारी २१ व रविवारी २२ जुलै रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथमच महाराष्ट्रातील १६ नामांकित अव्वल खेळाडू खेळणार आहेत. त्यामुळे चुरस वाढली आहे.

खेळाडूंबरोबरच पंचानाही गणवेश देण्यात येणार आहे. एकंदर ८ संघ या स्पर्धेत खेळणार असून प्रत्येक संघात महाराष्ट्राच्या अव्वल २ खेळाडूंचा सहभाग असेल. तर रत्नागिरी जिल्ह्यातील प्रत्येकी ३ खेळाडू असा एकंदर ५ खेळाडूंचा संघ असेल. इंडियन ऑइल, क्रिस्टल, लायबा सी फूड या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक असून एकंदर १ लाख २५ हजारांची रोख पारितोषिके व चषक देऊन स्पर्धेतील पहिल्या ३ संघाना गौरविण्यात येईल. यात स्पर्धेतील उत्कृष्ठ खेळाडू, उगवता खेळाडू, सर्वोत्कृष्ट संघ, तसेच स्पर्धेतील जास्तीत जास्त व्हाईट स्लॅम व ब्लॅक स्लॅम अशा अतिरिक्त बक्षिसांचा समावेश आहे.या स्पर्धेच्या सामन्यांचे चित्रीकरण करून महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या यु ट्यूब चॅनलवरून कॅरम रसिकांसाठी प्रसारित करण्यात येणार आहे. महत्वाचे काही सामने यु ट्यूबवरून लाईव्ह दाखविण्यात येणार असून स्पर्धेचे तात्काळ निकाल महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या ुारहरीरीहीरलरगी-रीीलळरींळेप.लेा या संकेत स्थळावर कॅरम रसिकांसाठी उपलब्ध करण्यात येणार आहेत. स्पर्धेचे उदघाटन २१ तारखेला सकाळी ठीक १० वाजता शिवसेनेचे उपनेते स्थानिक आमदार उदयजी सामंत यांच्या शुभ हस्ते होईल.

आठ संघांमध्ये होणार लढती

याप्रसंगी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष शिवकुमार लाड हे समारंभाचे अध्यक्ष म्हणून उपथित असतील. इंडियन ऑईलचे महाव्यवस्थापक मुकेश दास व उपमहाव्यवस्थापक सुरेश अय्यर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य किरण सामंत व इंडियन ऑईलचे क्रीडा व्यवस्थापक उदय बेडेकर व रत्नागिरी कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप भाटकर व सचिव मिलिंद साप्ते या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे मानद सचिव या स्पर्धेचे स्पर्धा संचालक व सह सचिव अजित सावंत तांत्रिक संचालक म्हणून काम पाहतील. तर आंतर राष्ट्रीय पंच आशिष बागकर हे प्रमुख पंच व राष्ट्रीय पंच साईप्रकाश कानिटकर हे सहाय्यक पंच म्हणून कामगिरी बजावतील. मिलिंद साप्ते, विवेक देसाई, राहुल बर्वे व नितीन लिमये यांच्यावर स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

सहभागी संघ

खानोलकर्स संघ : प्रशांत मोरे (विश्वविजेता), गणेश तावरे (राष्ट्रीय खेळाडू) इस्माईल मस्तान, अमोघ जोगळेकर, कुंदन खातू

रवीज स्ट्रायकर्स : मोहम्मद घुफ्रान (आंतरराष्ट्रीय खेळाडू), फईम काझी, दिनेश पारकर, जहुर कोतवडेकर, जाहिद मस्तान

सह्याद्री स्ट्रायकर्स : पंकज पवार (राष्ट्रीय खेळाडू), जितेंद्र काळे (आंतरराष्ट्रीय खेळाडू), सागर कुलकर्णी, विशाल ओतारी, विवेक देसाई

सत्यशोधक स्ट्रायकर्स : संदीप देवरुखकर (राष्ट्रीय विजेता), अभिषेक चव्हाण (राष्ट्रीय खेळाडू), राहुल भस्मे (राष्ट्रीय खेळाडू), योगेश कोंडविलकर, मुक्तानंद वरवडेकर

कॅरम मास्टर्स : रियाझ अकबरअली (आंतरराष्ट्रीय विजेता), विकास धारिया (राष्ट्रीय खेळाडू), संजय कोंडविलकर, असगर कोतावडेकर, ताहीर कोतावडेकर

क्यु ९ : अनिल मुंढे (राष्ट्रीय खेळाडू), गिरीश तांबे, अभिजीत खेडेकर, दस्तगीर शेख, विजय कोंडविलकर

व्हिक्टोरियंस : योगेश धोंगडे (राष्ट्रीय विजेता), अभिजीत त्रिपनकर (राष्ट्रीय खेळाडू), दत्ताराम वासावे, अल्ताफ मुंशी, अभिजित जांभेकर

मातोश्री विनर्स : योगेश परदेशी (विश्र् विजेता), झैद अहमद, दीपक वाटेकर, राहुल कदम, सुनील जाधव.

'वन डे' सामन्यात द्विशतक ठोकणारा फखर ठरला पहिला पाकिस्तानी फलंदाज

बुलावायो (झिम्बाब्वे), दि. २० - झिम्बाब्वेविरुद्ध सुरु असलेल्या एकदिवसीय मालिकेतील चौथ्या सामन्यात आज पाकिस्तानचा सलामीवीर फखर झमान याने तुफानी फटकेबाजी करत कारकिर्दीतील पहिले द्विशतक ठोकले. अशी कामगिरी करणारा फखर हा पहिला पाकिस्तानी फलंदाज ठरला.

फखरने या खेळीमुळे भारताचा सलामीवीर रोहित शर्मा याच्या तीन विक्रमांपैकी दोन विक्रम मोडीत काढले. रोहितने आतापर्यंत तीन वेळा द्विशतक झळकाविले असून त्यापैकी दोन वेळा २०८ व २०९ धावा केल्या होत्या.

हे दोन विक्रम झमानने मोडले. मात्र सर्वाधिक २६४ धावांचा रोहितचा विक्रम अबाधित राहिला. याशिवाय २१९ धावांचा वीरेंद्र सेहवागचा विक्रमही बचावला.

दरम्यान, पाकिस्तानच्या संघाने आज एकदिवसीय इतिहासातील सर्वोकृष्ट सलामी भागीदारीचा नवा उच्चांक गाठला. एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानचे सलामीवीर इमाम उल हक आणि फखर झमान यांनी पहिल्या विकेटसाठी ३०४ धावांची भागीदारी केली.

या सामन्यात झमानने नाबाद २१० धावांची खेळी साकारली तर इमामने ११३ धावा केल्या आणि झमानला शानदार साथ दिली. या दोघांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर पाकिस्तानला झिम्बाब्वेविरुद्धच्या या सामन्यात ३९९ धावांचा डोंगर उभारता आला.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये यापूर्वी हा विश्वविक्रम श्रीलंकेच्या सलामीवीरांच्या नावावर होता. श्रीलंकेच्या सनथ जयसूर्या आण उपुल थरंगा या सलामीवीरांनी २००६ साली लीड्स येथे झालेल्या एकदिवसीय सामन्यात २८४ धावा केल्या होत्या. त्यानंतर सुमारे १२ वर्षांनी हा विश्वविक्रम पाकिस्तानच्या सलामीवीरांनी मोडीत काढला.



बुध्दिबळात नवाब शेख सर्वोत्तम



वृत्तसंस्था

मुंबई, शुक्रवार - आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ दिन-२० जुलै रोजीचे औचित्य साधून आयडियल स्पोर्ट्स अक्कॅडमी व चेंबूरनाका मनपा शाळा क्रीडा केंद्र आयोजित मोफत सराव व स्पर्धात्मक बुध्दिबळ मार्गदर्शन शिबिरात टिळक नगर मनपा माध्यमिक शाळेचा नवाब महमद आलम शेख सर्वोत्तम ठरला.

मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी व प्रशिक्षक राजाबाबू गजेंगी आणि प्रशिक्षक नेव्हिल अल्वारीस यांनी मनपा १० शाळांतील निवडक १०० मुलामुलींना प्रोजेक्टर व प्रात्यक्षिकाद्वारे सरावात्मक व स्पर्धात्मक खेळाबाबत मार्गदर्शन केले. आयडियल शालेय बुध्दिबळ शिबिरात द्वितीय क्रमांक उबेर खान (चेंबूरनाका मुंबई पब्लिक स्कूल) व नितेश चौधरी (टिळक नगर मनपा माध्यमिक शाळा) यांनी तर तृतीय क्रमांक आर्य देवधर (हशू अडवाणी मेमोरियल शाळा), क्षितीज वैराळ (चेंबूरनाका मुंबई पब्लिक स्कूल) व हर्ष मोहिते (हशू अडवाणी मेमोरियल शाळा) यांनी उत्कृष्ट शिबिरार्थींचे पुरस्कार पटकाविले. या उपक्रमास मुंबई बुध्दिबळ संघटना, व्हीनस चेस अक्कॅडमी, आत्माराम मोरे प्रतिष्ठान व स्पोर्ट्स असोशिएशन फॉर स्कूल चिल्ड्रेन यांचे सहकार्य लाभले. विजेत्यांना पुरस्कार मुख्याध्यापिका उज्वला दारोळे, प्रशिक्षक राजाबाबू गजेंगी, नेव्हिल अल्वारीस, डॉ. जितेंद्र लिंबक, संयोजक लीलाधर चव्हाण यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

मुंबई शहर कबड्डी पंच मार्गदर्शन शिबीर रविवारी

वृत्तसंस्था

मुंबई, शुक्रवार - मुंबई शहर कबड्डी असो.चे जिल्हास्तरीय पंच मार्गदर्शन शिबीर रविवार २२ जुलै रोजी सकाळी ८-०० ते सायंकाळी ५-०० या वेळेत जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, न्हावा-शेवा, उरण, जिल्हा रायगड येथे आयोजित करण्यात आले आहे.

कबड्डी स्पर्धेत कबड्डी खेळाच्या नियमांचा आधार घेऊन वेगवेगळे निर्णय दिले जातात. अखिल भारतीय, राज्य आणि जिल्हा पातळीवरील सामनाधिकाऱ्यानी दिलेल्या निर्णयात सुसूत्रता व एकवाक्यता येण्यासाठी या शिबिरात अखिल भारतीय हौशी महासंघाच्या पंच समितीचे समन्वयक श्री विश्वास मोरे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या पंच मंडळाचे अध्यक्ष मनोहर इंदुलकर, तसेच सचिव शशिकांत राऊत हे मार्गदर्शन करतील .या शिबिरास महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील ज्या पंचाना सहभाग घ्यावयाचा असेल त्यांनी आगाऊ सूचना देऊन या शिबिरास उपस्थित राहण्याचे आवाहन मुंबई शहर कबड्डी असो.चे सचिव विश्वास मोरे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा पंच मंडळाचे अध्यक्ष दीपक मसुरकर (९८६९४६४४९४) किंवा सचिव सूर्यकांत देसाई (९८६९००३२२८) यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दक्षिण कोरियातील आंतरराष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धेत भारतीय खेळाडूंना आठ सुवर्णपदके



वृत्तसंस्था

मुंबई, शुक्रवार - दक्षिण कोरिया येथे सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी नेत्रदिपक कामगिरी बजावताना स्पर्धेत ८ सुवर्ण, ६ रौप्य, आणि ६ कास्य पदकांची कमाई केली. दक्षिण कोरिया येथे १२ जुलै ते २५ जुलै पर्यंत आंतरराष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धा सुरु आहे.

पुमसे स्पर्धेत तनिष्का वेल्हाळ, सौमया देसाई, सारा येवले, किरण पटेल या खेळाडूंनी सुवर्णपदक मिळविले तर आर्यन येवले याने रौप्य, अंगद नाडकर्णी याने कांस्य, विक्रांत देसाई याने रौप्य, गुंजन मिश्रा याने कांस्य, हार्दिक पटेल याने रौप्य, निशांत शिंदे याने कांस्य पदक मिळविले.

फाईट स्पर्धेत तनिष्का वेल्हाळ हिने सुवर्ण, सारा येवले हिने सुवर्ण, किरण पटेल हिने सुवर्ण, सौमया देसाई हिने रौप्य, आर्यन येवले हिने कांस्य, अंगद नाडकर्णी याने कांस्य, विक्रांत देसाई याने रौप्य, गुंजन मिश्रा याने रौप्य, हार्दिक पटेलने कांस्य, निशांत शिंदे याने सुवर्णपदक मिळविले. ही स्पर्धा २५ जुलैपर्यंत चालणार आहे .

पदक मिळविलेल्या खेळाडूंचे प्रशिक्षक जयेश वेल्हाळ , विक्रांत देसाई यांनी अभिनंदन केले असून अजूनही या स्पर्धेत खेळाडू पदक मिळवतील. असा विश्वास देखील जयेश वेल्हाळ यांनी व्यक्त केला आहे.

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
CIN: U74999MH2008PLC185349 | ई-मेल आयडी: mcx.secretarial@gmail.com | वेबसाईट: https://www.mcxccl.com

३० जून, २०१८ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखामध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० जून २०१८ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ मार्च २०१८ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून २०१७ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०१८ लेखापरीक्षित
एकूण उत्पन्न (इतर उत्पन्न)	२५६.४८	१८३.७३	३९.३१	५६६.२८
कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	१६१.२९	६५.८२	५.२४	३१६.८९
कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	१६१.२९	६५.८२	५.२४	३१६.८९
कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	११६.५१	१९.०९	५.०८	२०२.७४
कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	११६.५१	१९.०९	५.०८	२०२.७४
समभाग भांडवल (₹ १०/- प्रति शेअर)	१४,९९९.००	१०,६००.००	१०,६००.००	१०,६००.००
राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	४२२.३१
प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹ १०/- प्रत्येकी)*				
मूलभूत (₹)	०.११	०.०२	०.०२	०.२५
सौमिकृत (₹)	०.११	०.०२	०.०२	०.२५

*अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न हे वार्षिक नाही.

सूचना:
१) वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप मूळ कंपनीचे संकेतस्थळ www.mcxindia.com वर उपलब्ध आहे.
२) दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी, वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या बैठकीत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण: मुंबई | दिनांक: १९ जुलै २०१८

हे पत्र संचालक इंडियन नॅशनल प्रेस (बॉम्बे) प्रा. लिमिटेड यांच्याकरिता जी. एल्. लखोटिया यांनी जर्नल प्रेस, फ्री प्रेस हाऊस, २१५, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ येथे छापून प्रसिध्द केले. दिल्ली कार्यालय : १/१८ आय्.एन.एस्. बिल्डिंग, रफी मार्ग, नवी दिल्ली. ११०००१. कोलकाता कार्यालय : ८, मोइरा, स्ट्रीट, कोलकाता- ७०००१७. RNI No. 1691/57
मुंबई दूरध्वनी क्रमांक संपादकीय २२८५३३३५ (विस्तार -१३३) जाहिरात २२८७४५६६, २२८५३३३५, (विस्तार -१२४ व १२५) २२८५३३४२ फॅक्स : २२८७४६८८ AIR SURCHARGE 50 PAISE ONLY. E-Mail : navshakti.news@gmail.com/ mail@fpj.co.in व्यवस्थापकीय संपादक : गिरधरलाल लखोटिया, संपादक: सुकृत खांडेकर Reg. No. MCS/049/2018-20